# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला
## अर्थप्रशासन विभाग

### परिपत्रक

जा.क्र. अप्रवि / सेवार्थ / 621 / 2014 दिनांक :– 04 / 07 / 2014

विषय :– एसएयु सेवार्थ संगणक प्रणालीमध्ये वेतन देयके निर्गमित करण्याबाबत.

संदर्भ :– 1. महाराष्ट्र शासन निर्णय क्र.–कृषि व पदुम विभाग क्र.कृषिवि 2012 / प्र.क्र. 169 / 8–अे, दि. 23.11.2012

2. महाराष्ट्र शासन निर्णय क्र.–कृषि व पदुम विभाग क्र.कृषिवि 2012 / प्र.क्र. 169 / 8–अे दि. 01 जूलै 2014

या परिपत्रकाव्दारे सर्व विभाग प्रमुख, आहरण व संवितरण अधिकारी तसेच वेतन व लेखा अधिकारी, अकोला / नागपूर यांना कळविण्यात येते की, माहे जूलैं 2014 च्या ऑगस्ट 2014 मध्ये देय होणारे वेतन एसएयु सेवार्थ प्रणालीमधून निर्गमित करावयाचे आदेश संदर्भ क्र. 2 नुसार करण्यात आलेले आहे.

कार्यालयातील उपलब्ध संगणक साधनसामुग्रीव्दारे किंवा खाजगी संगणक केंद्रामधून एसएयु सेवार्थ संगणक प्रणालीमध्ये माहे जूलै 2014 च्या ऑगस्ट 2014 मध्ये देय वेतन निर्गमित करून घेण्यात यावेत. जर यामध्ये काही तांत्रीक अडचण येत असल्यास, संबंधित आहरण व संवितरण अधिका–यांनी लेखी स्वरूपात सदर अडचण नियंत्रक कार्यालयास दि. 11 जूलै 2014 पर्यंत सादर करावी.

याबाबत काटेकोर अंमलबजावणी करावी.

नियंत्रक
डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,
अकोला

तात्काळ/ई-मेल द्वारे

**महाराष्ट्र शासन**

क्रमांक : कृषिवि-२०१२/प्र.क्र.१६९/८-अे
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ०१/०७/२०१४.

प्रति,

कुलगुरु, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, जिल्हा अहमदनगर,

कुलसचिव/ नियंत्रक, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, जिल्हा अहमदनगर,

**विषय :- साऊ सेवार्थ (SAU SEVAARTH) या संगणकीय प्रणालीच्या अंमलबजावणीबाबत.**

संदर्भ :- १) शासनाचे समक्रमांकाचे दिनांक १६/६/२०१४ चे परिपत्रक,
२) शासनाचे समक्रमांकाचे दिनांक १/७/२०१४ चे पत्र व त्यासोबतचे इतिवृत्त.

महोदय,

साऊ सेवार्थ (SAU Sevaarth) प्रणालीच्या अंमलबाजावणीबाबत शासनस्तरावर मा. अ. मु. सचिव (कृषि) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २७/६/२०१४ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीचे इतिवृत्त संदर्भाधीन दिनांक १/७/२०१४ च्या पत्रान्वये कार्यवाहीसाठी आपणाकडे पाठविण्यात आले आहे. सदर बैठकीत मा. अ. मु. सचिव (कृषि) यांनी दिलेल्या निर्देशानुसार कृषि विद्यापीठांना माहे जुलै, २०१४ च्या ऑगस्ट २०१४ मध्ये देय होणा-या वेतनाची संगणकीकृत देयके कोषागारांना सादर करणे शक्य व्हावे व त्यांना साऊ सेवार्थ (SAU Sevaarth) प्रणालीद्वारे वेतन देयके तयार करण्यात येणा-या अडचणींचे निराकरण करण्यासाठी मे. टाटा कन्सलटन्सी सर्व्हीसेसचे प्रतिनिधी व सल्लागार, मे.अॅक्सेंच्युअर कंपनी लिमिटेड हे चारही कृषि विद्यापीठांतील निवडक कर्मचा-यांना दिनांक १४ व १५ जुलै, २०१४ या दोन दिवसांकरीता कार्यालयीन वेळेत महात्मा फुले कृषि विद्यापीठ राहुरी येथे प्रशिक्षण देणार आहेत. सदर प्रशिक्षणामध्ये कृषि विद्यापीठांच्या ज्या काही अडचणी असतील त्या सोडवून घेण्यासाठी शेवटची संधी मिळणार आहे. सदर प्रशिक्षणाचे आयोजन आपल्या कृषि विद्यापीठाने करावयाचे आहे. त्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, दिनांक १४ ते १५ जुलै, २०१४ या कालावधीत वरील प्रशिक्षणाचे आयोजन करण्यासाठी लागणारी संपूर्ण व्यवस्था तात्काळ करावी, ही विनंती.

आपला,

(वि. ए. डोके)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत,

सह संचालक (सुधारणा), लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई,

यांना विनंती करण्यात येते की, साऊ सेवार्थ प्रणालीच्या प्रशिक्षणासाठी दिनांक १४ ते १५ जुलै, २०१४ या कालावधीत महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, अहमदनगर येथे उपस्थित राहण्याकरीता त्यांच्या कार्यालयातील प्रतिनिधी, मे. टाटा कन्सलटन्सी सर्व्हीसेस लिमिटेड कंपनीचे प्रतिनिधी व सल्लागार, मे. अॅक्सेंच्युअर कंपनी लिमिटेड यांना आवश्यक त्या सूचना कृपया द्याव्यात.

प्रत,

सल्लागार (वित्त), महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, १३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे-७,

कुलसचिव/ नियंत्रक, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा रत्नागिरी,

कुलसचिव/नियंत्रक, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी, जिल्हा परभणी,

कुलसचिव/नियंत्रक, डॉ. पंजाबराव देशमख कृषि विद्यापीठ, ...